# प्रेस रिपोर्ट

## सिम्बायोसिस लॉ स्कूल, पुणे

## हॉल ऑफ फेम पुरस्कार सोहळा, २०२३ ( १८ मार्च २०२३ रोजी)

सिम्बायोसिस अंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठाच्या सिम्बायोसिस विधी महाविद्यालय , पुणे इथे १८ मार्च २०२३ रोजी दुपारी ४ वाजता हॉल ऑफ फेम पुरस्कार वितरण सोहळा - २०२३ चे आयोजन केले होते. प्रा. डॉ. शशिकला गुरपूर, फुलब्राइट स्कॉलर, संचालिका, सिम्बायोसिस विधी महाविद्यालय ,-पुणे, अधिष्ठाता , विधी विभाग , (एस आय डी यु), जीन मोने चेअर प्रोफेसर (EUC- LAMP EU) आणि प्रमुख पाहुणे श्री अमिताभ गुप्ता आय पी एस , अतिरिक्त पोलीस महासंचालक आणि तुरुंग व सुधारात्मक सेवा महानिरीक्षक त्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर प्रा.डॉ.शशिकला गुरपूर यांचे स्वागतपर भाषण झाले. डॉ. गुरपूर यांनी तरुण मनांच्या संगोपनात शिक्षणाची महत्त्वाची भूमिका अधोरेखित करणारे विचारप्रवर्तक भाषण केले. 'हॉल ऑफ फेम' पुरस्कार सोहळा केवळ शैक्षणिक उत्कृष्टतेचाच नव्हे तर सर्वांगीण उत्कृष्टतेचा गौरव करण्यासाठी आहे यावर भर देऊन निकोप स्पर्धा वाढवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यासाठी उत्कृष्ट कामगिरी ओळखण्याचे महत्त्व सांगितले. तसेच बँक ऑफबडोदा संघा ची भविष्य घडवणाऱ्या प्रेरणादायी प्रतिभेसाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.त्याचसोबत महिला विद्यार्थ्यांमधील सर्वांगीण उत्कृष्टतेसाठी पुरस्काराचा उल्लेख केला आणि विद्यार्थ्यांना मर्यादांच्या पलीकडे जाण्यासाठी प्रोत्साहित केले. स्वागतपर भाषणानंतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

पी.सी.जी.टी. पुणे चॅप्टरचे सदस्य श्री. सत्यबीर एस. डोड, आय. ए. एस. (निवृत्त), यांनी चंपावती डोड पुरस्कार , जो कृष्ण व अर्जुन यांच्या रथच्या रूपात करण्यात आलेली रोलिंग ट्रॉफी आहे, याबद्दल माहिती दिली. हा पुरस्कार सिम्बायोसिस विधी महाविद्यालय पुणे, नागपूर, हैद्राबाद किंवा नोएडाच्या माजी विद्यार्थ्याला प्रदान केला जाईल जो अखिल भारतीय नागरी सेवांसाठी पात्र ठरला आहे याबद्दल माहिती दिली. त्यांनी भारतातील नागरी सेवांच्या इतिहासाचा आढावा दिला आणि यु पी एस सी परीक्षा देण्याचे स्वतःचे अनुभव सांगितले. ज्याला जगातील सर्वात कठीण परीक्षांपैकी एक म्हणून ओळखले जाते असे नमूद केले . विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यासाठी त्यांनी या पुरस्काराची स्थापना केली. श्री डोड यांनी त्यांच्या

आईची प्रेरणादायी जीवनकहाणी सांगितली, जिच्या नावावर हा पुरस्कार आहे, तिच्या उल्लेखनीय प्रवासाबद्धल माहिती दिली.

प्रमुख पाहुणे, श्री अमिताभ गुप्ता, आय पी एस. यांनी दृढनिश्चय, परिश्रम आणि निर्णय घेण्याची क्षमता व कला यावर भाषण केले. ध्येयांचा पाठपुरावा करण्यासाठी चिकाटीवर भर दिला आणि समोर येणाऱ्या अडथळ्यांमधून धडा घ्या असेही सांगितले . 'त्वरित निर्णय घेण्यास' प्रोत्साहन दिले आणि उच्च अधिकाऱ्यांमध्ये निर्णय घेणे अधिकाधिक आव्हानात्मक कसे आहे याबद्दल विवरण केले. सध्याचे ज्ञान पुस्तकांच्या मर्यादेपलीकडे पसरलेले आहे हे सांगताना पुस्तकाबाहेरील स्रोतांमधून जगातील नवीनतम घडामोडींच्या जवळ राहण्यासाठी यु ट्यूब , चित्रपट आणि माहितीपट यासारख्या पर्यायी स्त्रोतांचा फायदा घेऊन क्षितिजे विस्तृत करण्याचा सल्ला दिला.

सिंबायोसिस विधी महाविद्यालय , पुणे ची माझी विद्यार्थिनी वरुणा अग्रवाल, आय ए एस . ए एस डी एम , सदर डेहराडून,हिला चंपावती दोड पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते, त्यांनी तिच्या महाविद्यालयीन अनुभव आणि वकिलांबद्दलच्या आदरभावना व्यक्त केल्या . ज्ञान क्वचितच वाया जाते आणि त्यामुळे अभ्यास हलक्यात घेऊ नये, असे सांगून तिने विद्यार्थ्यांना त्यांच्या वेळेचा विवेकपूर्ण वापर करण्यास प्रोत्साहित केले. कायदेशीर क्षेत्र लोकांच्या नजरेत बदनाम होऊ नये आणि व्यवसायात नैतिकता टिकवून ठेवण्यासाठी काम करण्याचे महत्त्व व्यक्त केले.

त्यानंतर, परीक्षेमध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थी विद्यार्थिनींचा सत्कार करणेत आला. डॉ. अपराजिता मोहंती, उपसंचालिका (शैक्षणिक) यांनी आभार व्यक्त करून कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाली.




मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन सोहळा



डावीकडून उजवीकडे - प्रा. क्षितिज नाईकडे , ( उपसंचालक, प्रशासन, ) श्री. सत्यबीर डॉड आय ए एस , पी सी जी टी चे सदस्य , प्रा. डॉ. शशिकला गुरपूर ( संचालिका , सिंबायोसिस विधी महाविद्यालय , पुणे , अधिष्ठाता , विधी विभाग , (एस आय यु.) , जीन मोने चेयर प्रोफेसर , EUC -LAMP ) , श्री अमिताभ गुप्ता , आय पी एस , डॉ, अपराजिता मोहंती ( उपसंचालिका , शैक्षणिक )



तापीया झुनेद ( सिम्बायोसिस विधी महाविद्यालय, पुणे चा माजी विद्यार्थी ) याचा विधी अभ्यासक्रमात प्रथम क्रमांक आलेबद्दल सत्कार करताना प्रा. डॉ. शशिकला गुरपूर.